मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दि.२०.०९.२०२३ रोजी संपन्न् झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

---

दिनांक २०/०९/२०२३ रोजी दुपारी ४.३० वाजता पालघर जिल्हयासाठी निर्यात प्रचालन समिती बैठक मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, जिल्हा पालघर येथे मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती. सदर बैठकीसाठी खालील प्रमाणे पदाधिकारी उपस्थित होते.

| क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | Shri. Govind Maruti Bodake | Hon'ble Collector, Palghar |
| २ | Shri. Vikrant Patil | LDM, Palghar |
| ३ | Shri. Vinod Hegde | Agriculture Officer, Palghar |
| ४ | Shri. Sudhanshu Ashwin | Nabard Bank, Palghar |
| ५. | Shri. Dinesh Patil | Assistant Commissioner, Fisheries Dept., Palghar |
| ६ | Shri. Lobo | DGFT, Mumbai |
| ७ | Shri.Pratap Singh | EEPC, Mumbai |
| ८ | Shri. Sunil Akrekar | Fish Cluster, Vikramgad |
| ९ | Shri. Yadnesh Save | Chiku Exporter |
| १० | Shri. Manish Deshmukh | Dandekar Collage, Palghar |
| ११ | Shri. Pranav Z. | EY Team |
| १२ | Shri. Rajendra Gole | Member, TIMA, Boisar. |
| १३ | Shri. Digivjay Pol | Manager, DIC, Palghar |
| १४ | Shri. Vickey Khirale | Manager, DIC, Palghar |
| १५ | Smt. V.B. Sone | General Manager, District Inds. Centre, Palghar |

श्रीमती व्हि.बी. सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी District Export Action Plan यांचे सविस्तर सादरीकरण करुन चर्चा करण्यात आली. पालघर जिल्ह्याकरीता Chemicals चे निर्यातीचे प्रमाण १६.९६ टक्के आणि Iron & Steel चे ४९.२६ टक्के असून इतर उत्पादने यांच्या निर्यातप्रमाणाबाबत उपस्थितांना अवगत केले. तसेच, पालघर जिल्ह्याकरीता ODOP अंतर्गत चिक्कू उत्पादन व Marine Products हे दोन असल्याबाबत सभेस सांगितले.

तसेच मागील बैठकीत Sustainable Export Promotion साठी १० Points (Annexure-I) आणि ODOP and Export Promotions साठी चे ७ Points (Annexure-II) नुसार झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. दिनांक ०५.०९.२०२३ रोजी World Trade Centre, Mumbai येथे महाराष्टातील जिल्ह्यानुसार ODOP उत्पादनांचा प्रदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास मत्स्य उत्पादनेसाठी श्री. सुनिल आरेकर (अध्यक्ष, फिश क्लस्टर, विक्रमगड) हे उपस्थित होते. त्यांनी सभागृहास सदर कार्यक्रमाची माहिती दिली.

पालघर जिल्ह्याच्या Export Action Plan वर झालेल्या चर्चेअंती पालघर जिल्ह्यातील सध्याचे निर्यातीतील प्रमाण बघता भविष्यात आणखीन वाढ शक्य आहे ते प्रमाण वाढवण्यासाठी DGFT आणि EEPC यांना प्रचालन कॅम्प आयोजित करण्याबाबत

निर्देशित केले होते त्यानुसार TIMA संस्थेने कॅम्प साठी, Outreach Program साठी तारीख आणि वेळ संबंधित ईमेल व्दारे DGFT आणि EEPC पत्रव्यवहार करावे असे मा. अध्यक्षांनी निर्देशित केले.

तसेच बैठकीत उपस्थित श्री. पाटिल, मत्स्य विभाग आयुक्त, पालघर यांनी Outreach Program साठी CIFE आणि Export Councils यांच्या मदतीने एक्पोर्टसाठी एक फोरम तयार करावे असे सुचविले.

दांडेकर महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. मनिष देशमुख यांनी पालघर जिल्ह्याचे निर्यात वृध्दीसाठी उपस्थितांना विद्यार्थ्यांना निर्यातीसंबंधीत मार्गदर्शनासाठी वार्षिक प्रकल्प, सर्व्हे, प्रोजेक्ट्स, नाविन्यपूर्ण कल्पना व निर्यातीतील संधी याबाबत शिबिर आयोजित करणार आहेत. तसेच विद्यार्थ्यी Palghar, ODOP साठी एक माहितीपुस्तिका तयार करणार आहेत त्याबाबत सभागृहात चर्चा झाली.

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी औद्योगिक क्षेत्रासाठी मरीन प्रॉडक्टस व कृषी प्रक्रियेंतर्गत चिकू उत्पादन या एक जिल्हा एक उत्पादन या निवड करण्यांत आलेल्या वस्तूंचे उत्पादनासाठी जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात वाव असल्यामुळे उद्योजक/ उत्पादक यांनी सदर वस्तूंचे उत्पादनासाठी औद्योगिक गुंतवणूकीचे माध्यमातून प्रयत्न करुन या वस्तूंची जास्तीत जास्त निर्यातीवाढीसाठी प्रयत्न करण्यांचे आवाहन सर्व उपस्थित उद्योजक/ निर्यातदार व औद्योगिक संघटना यांना केले

तसेच, श्रीमती वृषाली सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी डॉ. विवेक वर्तक, खार भुमी संशोधन संस्था, पनवेल यांच्यामार्फत मत्स्य उत्पादनातील निर्यात संधी व विविध मत्स्य उत्पादने याचे प्रशिक्षण पालघर जिल्ह्यात MCED संस्थेसोबत मिळून पालघर आणि डहाणू येथे आयोजित करण्यात आल्याचे अध्यक्षांना कळविले.

तसेच, श्री. विनोद हेगडे, कृषी अधिकारी यांनी ODOP संदर्भात चिक्कू उत्पादन उद्योगातील गुंतलेल्या विक्रेते आणि खरेदीदार यांची एक सामायिक बैठक लवकरात लवकर आयोजित करणार असल्याचे आश्वासन मा. अध्यक्षांना दिले.

शेवटी श्रीमती व्हि.बी. सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी सदरची बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

महाव्यवस्थापक, जिउकें पालघर
तथा
सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, पालघर.
तथा
मा. अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती